नि.फौ.ख.क्र. ९८/२०२३
शासन विरुध्द सचिन
नि.क्र. १८

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव – मंगल वसंत यादव
वय – ६३ वर्षे, कामधंदा - शेती
राहणार – गुळुंब, तालुका वाई.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर.जाधव** -

मी आरोपीस ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे. तो माझा पुतण्या आहे. घटना दि. ०७ जानेवारी २०२३ रोजी पट्टी नावाच्या रानात गुळुंब येथे संध्याकाळी ०७.०० वाजता घडली होती. त्या दिवशी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास मी व माझे पती घटनास्थळी म्हणजेच आमच्या रानात गहु या पीकाला आमच्या रानातील सामाईक विहीरीतुन पाणी दयायला गेलो होतो. परंतु त्यावेळी विहीरीला पाणी नव्हते कारण आरोपीने ते बापुराव पानसे यांना पुर्वीच विकत दिले होते. त्यांचे शेत आमच्या रानाशेजारी आहे. सदरील विहीरीचे पाणी विक्री देण्यापुर्वी आरोपीने आमची परवानगी घेतली नव्हती. आरोपीने विहीरीचे पाणी विक्री केल्याने आम्ही त्या दिवशी आमच्या पीकाला पाणी देवु शकलो नव्हतो. त्यामुळे माझ्या पतीने म्हणजेच वसंत बाजीराव यादव यांनी बापुराव पानसे यांच्याशी वाद घातला. त्यानंतर आम्ही घरी निघुन गेलो. संध्याकाळी त्याच दिवशी आमचे शेजारी मृत्यू पावल्याने त्यांच्या अंत्यसंस्काराकरीता माझे पती गेले होते. त्यामुळे मी माझ्या रानात म्हशींच्या गोठयात दुध काढण्याकरीता सायंकाळी ०७.०० चे सुमारास गेले होते. तेव्हा आरोपी शिवीगाळ करीत होता. मी त्यावेळी त्यास कुणाला शिव्या देतोस असे म्हणाले असता त्याने पिंपर्णीच्या मुळीच्या लाकुडाने मला छातीवर मारहाण केली. त्यामुळे मी जमिनीवर कोसळले. तेव्हा मी आरडाओरड केल्याने शेजारचे किसन यादव व माझी सुन रुपाली अजित यादव तेथे आली. त्यांनी मला सोडविले. त्यामुळे मी भुईंज पोलीस ठाणे येथे मी गेले. त्यावेळी माझी सुन रुपाली, नातवंडे अंजली व अनुराग व माझे पती माझ्यासोबत होते. पोलीसांनी मला शासकीय रुग्णालयात भुईंज येथे उपचाराकरीता पाठविले. तेथे माझ्यावर उपचार करण्यात आले व रात्रीचे ०२.०० वाजता मला डिस्चार्ज दिला. त्यानंतर दुसया दिवशी म्हणजेच दि. ०८ जानेवारी २०२३ रोजी मी घटनेची फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ती **नि.क्र.१९** वर आहे.

२. त्यानंतर दि. ०९ जानेवारी २०२३ रोजी आमच्या पट्टी नावाच्या रानात पोलीस आले होते. त्यावेळी त्यांनी माझा भाचा मंगेश पवार व हणमंत गुलाब यादव यांना तेथे बोलाविले होते. मी त्यावेळी तेथे गेले नव्हते. तथापी त्याच दिवशी शेडजवळ पोलीसांनी मला बोलाविले होते. तेव्हा तेथे मंगेश पवार व हणमंत यादव देखील हजर होते. त्यावेळी मी तेथे पोलीसांना मला ज्या मुळीने मारले होते ती दाखविली होती. पोलीसांनी ती मुळी जप्त केली होती. मला ती मुळी दाखविल्यास मी ती ओळखू शकते. आता मला आर्टीकल डी वरील मुद्देमाल क्र. २७/२०२४ दाखविण्यात आला. सदरील मुद्देमाल

म्हणजे तीच मुळी होय. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. मी ती सही सदरील पंचनामा झाल्यानंतर केली होती. सदरील पंचनाम्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. आता मला आर्टीकल ए ते सी वरील फोटो दाखविण्यात आले. ते दि. ०९.०१.२०२३ रोजी पंचनामा कार्यवाहीच्यावेळी काढण्यात आले होते. त्या ठिकाणी मला मारहाण करण्यात आली होती. मी सर्व उपचार भुईंज येथे घेतले होते. मला त्या मारहाणीत छातील दुखापत झाली होती.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री डी. पी. धुमाळ**

३. हे म्हणणे खरे आहे की सामाईकातील विहीरीमध्ये मी व आरोपीसह एकुण चार जणांचा हक्क आहे व प्रत्येकजण आपापल्या हिश्याप्रमाणे त्यातील पाणी वापरतो. हे म्हणणे खरे आहे की माझा आरोपीशी सदरील विहीरीतुन पाणी उपसण्यावरुन वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की मी व माझे पती यांनी केलेल्या सुचना आरोपी ऐकत नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी आरोपी विरुध्द पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

४. हे म्हणणे खरे आहे की आमच्या रानातील गोठयाजवळ पिंपर्णीचे झाड असुन त्याखाली ब-याच मुळया पडलेल्या असतात. हे म्हणणे खरे नाही की मी कथीत घटनास्थळी जाण्यापुर्वीच पोलीसांनी त्या मुळयांपैंकी एक मुळी काढुन ठेवली होती. हे म्हणणे खरे आहे की आमच्या रानाला कुंपण नाही. साक्षीदार स्वतहुन सांगते की तेथे कमरेइतकी ताल आहे. हे म्हणणे खरे आहे की तेथे कुणीही सहज जावु शकते. मला जवळ व लांब असा दोन्ही अंतराचा चष्मा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी तालावर पडल्यामुळे मला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की मी कथीत घटनेच्यावेळी जमिनीवर पडले होते. मी ज्यावेळी कथीतरीत्या डॉक्टरांकडे उपचाराकरीता गेले होते तेव्हा त्यांनी माझ्याकडे विचारपुस केली होती. हे म्हणणे खरे आहे की मी पडल्यामुळे मला दुखापत झाल्याने डॉक्टरांनी माझ्यावर उपचार केले.

५. हे म्हणणे खरे आहे की घरी आल्यानंतर कुटूंबीयांशी चर्चा झाल्यानंतर दुस-या दिवशी मी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पतींनी देखील कथीत घटनेच्या दुस-या दिवशी घटनेची माहिती दिली होती व त्यानंतर माझी सही घेण्यात आली होती. मी या पुर्वी तीनदा न्यायालयात आले होते. त्यावेळी मी सही केलेला कागद वाचुन पाहिला होता व त्याप्रमाणे आज रोजी साक्ष देत आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात सांगितल्यानुसार कोणतीही घटना घडलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझा पुतण्या असल्याने केवळ त्याला त्रास देण्याच्या हेतुने मी त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की मी स्वतःच पडले होते व त्यामुळे मला जखमा झाल्या होत्या या बाबींचा फायदा घेवुन मी

आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की कोणतीही पंचनामा कार्यवाही झालीच नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मला कोणतीही मारहाण झालेली नव्हती व त्यामुळे मी डॉक्टरांना त्या बाबत माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी ज्यावेळी कथीतरीत्या पडले त्यावेळी तेथे किसन यादव व माझी सुन रुपाली हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की किसन यादव हा माझ्या भावकीतला आहे. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल डी वरील काठीने मला कधीही मारहाण करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुतची केस खोटी असुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
*स्वाक्षरी/-*

दि.२०.०६.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.